महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!
एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.
✻ संपादक ✻
मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - २९ ■ शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

## देसराणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी सौ. वर्षाताई हिरे यांची निवड




**दै. आवाज वृत्तसेवा...**

महेश कुवर, देसराणे (वार्ताहर) :- कळवण तालुक्यातील देसरणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी सौ. वर्षाताई रविंद्र हिरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

आवर्तन पद्धतीनुसार कुंदन भारत हिरे यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले . त्यामुळे येथील ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. त्यात उपसरपंच पदासाठी वर्षाताई हिरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

उपसरपंच पदासाठी वर्षाताई हिरे यांना सूचक म्हणून ग्रामपंचायत सदस्य सचिन लक्ष्मण बहिरम हे होते. वर्षाताई हिरे यांची बिनविरोध निवड झाल्याने गावाच्या वतीने पंडित शंकर पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या निवड प्रसंगी ग्रामपंचायतीचे सरपंच भगवान वाघ ग्रामपंचायत सदस्य कुंदन हिरे , सचिन बहिरम , शिवदास पवार , मंगेश सोनवणे , ग्रामपंचायत सदस्या सिंधुताई बहिरम , माई गांगुर्डे , स्वप्ना खरे , शानुबाई सोनवणे , ग्रामपंचायत अधिकारी संतोष खेडकर तसेच काँगेस चे महेद्र केदाजी हिरे , संतोष नेवबा हिरे , पत्रकार सतीश कुवर , कारभारी हिरे , दादाजी हिरे , निलेश शेवाळे , अमोल(मुन्ना)हिरे , योगेश हिरे , विक्रम खरे , माधव जाधव , विश्वास हिरे,जगदीश खरे , शशी हिरे, कळवण बाजार समितीचे सचिव रविंद्र नारायण हिरे ,भावराव हिरे , वाल्मीक देवघरे, रविंद्र बाबुराव हिरे, सुनील हिरे ,हिरामण बहिरम , सचिन देवघरे ,राकेश हिरे, समाधान हिरे , राहुल पवार , प्रतीक वाघ , नानाजी हिरे , कौतिक हिरे , नवल शिंदे , भाऊसाहेब निंबा हिरे , प्रशांत हिरे , गुलाब हिरे ,युवराज हिरे , शिवदास महाले , मुरलीधर बहिरम , पिंटू सोनवणे , ग्रामपंचायत कर्मचारी दिपक पवार , बिपीन हिरे , निलेश हिरे , रविंद्र सोनवणे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे चाळीसगाव प्रतिनिधी :- क्रीडा शिक्षक स्पर्धे पुरते, मर्यादित न राहता विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित असावा व शालेय क्रीडा स्पर्धा ह्या खेळीमेळीच्या वातावरणात घ्याव्यात असे आवाहन जळगांवचे जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी केले . वाघळी ता. चाळीसगाव येथील शेठ कुंदनमल इंदरचंद राका माध्यमिक विद्यालय येथे आयोजित शालेय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यासाठी बोलवण्यात आलेल्या क्रीडा शिक्षकांची सहविचार सभेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक शेखर देशमुख हे होते.शेठ कुंदनमल इंदरचंद राका माध्यमिक विद्यालय-वाघळी,ता. चाळीसगाव येथे दि.२९जुलै मंगळवार रोजी, तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन सन २०२५/२६ या शैक्षणिक वर्षात सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख अतिथी जळगाव जिल्हा क्रीडाधिकारी रविंद्र नाईक,तालुका क्रीडाधिकारी जगदीश चौधरी , क्रीडाधिकारी सचिन निकम,



राज्य योगा मार्गदर्शक चंचल माळी , मुख्याध्यापक प्रशांत पाटील, सेवानिवृत्त मुख्याध्यापक गुलाब चव्हाण , युवराज भोसले, गोरख सूर्यवंशी,माजी नगरसेवक व मुख्याध्यापक दीपक पाटील , तालुका क्रीडा समन्वयक शाळेचे पर्यवेक्षक अजय देशमुख आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांचा झाडांची रोपे व गुलाब पुष्पगुच्छ आणि शाल श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा शिक्षक हेमंत गोरे,तुषार निकम,पत्रकार यशवंतराव ताडगे सर, विजय देशमुख, राहुल साळुंखे, योगेश साळुंखे, शरद सूर्यवंशी,विजय शितोळे, संजय राठोड, राहुल राजपूत,रविंद्र पवार, खुशाल देशमुख, झहीर खान, श्रीमती सीमा मालोदकर, कल्पना चव्हाण, माजी नगरसेवक व शिक्षिका सविता राजपूत, सुधीर पाटील, संदीप कुंटे,पी. एस. पाटील, महेंद्र निकम आदी क्रीडा शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक शेखर देशमुख सर, पर्यवेक्षक व तालुका क्रीडा स्पर्धा समन्वयक अजय देशमुख सर,जिल्हा क्रीडाधिकारी रविंद्र नाईक व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले विद्यार्थिनी स्वागतगीत गायले.

यावेळी क्रीडा शिक्षक कै.संजय राजपूत व पाटील यांचे दुःख निधन झाले,. त्यांच्या आत्म्यास चिरकाल शांती लाभो या साठी श्रद्धांजली वाहण्यात आली.

या प्रसंगी सचिन निकम क्रीडाधिकारी यांनी क्रीडा स्पर्धा व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया,या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले जिल्हा क्रीडाधिकारी रवींद्र नाईक यांनी मार्गदर्शनात सांगितले की, क्रीडा शिक्षक फक्त स्पर्धा पुरता मर्यादित न राहता , विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित असावा.क्रीडा संबंधित विविध शासकीय योजनाची माहिती देण्यात आली. तालुक्यातील शाळेने, माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालय यांनी क्रीडा योजनेचा लाभ घ्यावा. योजने संबंधित अडचण असल्यास , सोडवण्यात तत्पर राहीन असे आवाहन जळगांवचे जिल्हा क्रीडाधिकारी रविंद्र नाईक यांनी शेवटी बोलतांना सखोल असे मार्गदर्शन केले. योगासन या क्रीडा प्रकारात राज्य क्रीडा मार्गदर्शक, श्रीमती चंचल माळी यांनी योगासनाचे विविध खेळाचे प्रोजेक्टर च्या साह्याने खेळाचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले तालुका क्रीडा समन्वयक अजय देशमुख यांनी तालुकास्तरीय खेळविल्या जाणाऱ्या स्पर्धा दहा खेळांचे वेळापत्रकाचे नियोजन करून देण्यात आले.✻

कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख डी.बी.महाजन , अनिल साळुंखे सर,.रमाकांत जावरे सर , राजेंद्र परदेशी , प्रशांत भोई, सी.डी. दाभाडे, सुनिल पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## नागपंचमीच्या निमित्ताने शाळांमध्ये सर्प जनजागृती




**दै. आवाज वृत्तसेवा...**

नागपंचमीच्या निमित्ताने ए जे ॲनिमल प्रोटेक्शन सोसायटी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शहरातील विविध शाळांमध्ये सर्पांविषयी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विषारी व बिनविषारी सापांची माहिती, साप चावल्यावर घ्यावयाची काळजी, आणि सर्पमित्रांचे कार्य याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. व पर्यावरणातील महत्व समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत सर्पांबद्दल असलेले गैरसमज दूर केले. ए जे ॲनिमल प्रोटेक्शन सोसायटीचे मा. संस्थापक अध्यक्ष अभिलाष जाधव व समाधान मिसाळ शुभम साळवे सोमनाथ येवले यांनी सापांविषयी माहिती दिली या उपक्रमाचे आयोजन. आम्रपाली जाधव करन गंगावने केले होते. संस्थेच्या वतीने असे कार्यक्रम पुढेही सातत्याने राबवले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# राजसत्ता आणि धर्मसत्ता दुषित झाली तर जनता दुखी होते - बाळू महाराज गिरगावकर यांचे प्रतिपादन...!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शांताराम मगर प्रतीनीधी लोणी-खुर्द - राजसत्ता आणि धर्मसत्ता ही दोन्ही लोककल्याणासाठी असते. पण या सत्तांमध्ये जर भ्रष्टाचार, अन्याय व अहंकार शिरला, तर सामान्य जनता भरडली जाते. त्यामुळे सत्ता शुद्ध, पारदर्शक आणि सेवाभावी असली पाहिजे, असे मार्मिक प्रतिपादन बाळू महाराज गिरगावकर यांनी केले. वैजापुर तालुक्यातील तलवाडा येथे सुरू असलेल्या संत बहिणाबाई सप्ताहाच्या कीर्तनात ते बोलत होते. त्यांनी भगवद्भक्ती, सदाचार आणि सामाजिक सजगतेवर भर दिला. धर्मसत्तेचा उपयोग जर स्वार्थासाठी झाला, तर ती लोकांमध्ये फूट पाडते, आणि राजसत्तेचा गैरवापर झाला, तर ती दडपशाही बनते. म्हणुन जनता दुखी होते. त्यामुळे दोन्ही सत्तांना जनतेच्या हिताचे भान राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे बोलतांना



बाळु महाराज गिरगावकर म्हणाले वारकरी संप्रदाय शेतकऱ्याच्या जिवावर उभा आहे

शेती म्हणजे केवळ अन्न उत्पादन नव्हे, ती एक संस्कृती आहे. माळावर शेती करून जिवंत ठेवण्याचं पवित्र कार्य शेतकरी करत असतो,पावसाच्या प्रतीक्षेत असलेला शेतकरी म्हणजे भक्तीचा खरा मूर्तिमंत नमुना आहे. त्याचं जगणं आणि शेतातलं राबणं हेच खरं हरिपाठ आहे.

वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची एक महान अध्यात्मिक परंपरा आहे, जी हजारो वर्षांपासून भक्ती, श्रद्धा, आणि समाजसेवा यांचा दीप जळवत आहे. या संप्रदायाचा कणा म्हणजे आपल्या मातीत राबणारा, घाम गाळणारा शेतकरी. शेतकरीच अन्नदाता असून तोच वारीसाठी आवश्यक धान्य, फळे, फुलं, आणि प्रसाद पुरवतो. संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखामेळा यांसारखे अनेक संतही शेतकरी कुळातच जन्मले. त्यांच्या ओव्या, अभंगांतून शेतमजुरी, मातीतली श्रद्धा, आणि शेतीचे कष्ट या गोष्टी वारंवार प्रकट होतात. वारीतील दिंड्या, भजन, कीर्तन, आणि पालख्या या सर्व गोष्टी शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमावर उभ्या आहेत. वारीच्या काळात शेतकरी आपली शेती, घर, जनावरं सांभाळून भक्तीपरंपरेशी एकरूप होतो.

शेतकरी म्हणजेच वारकरी,तोच खरा भक्तीचा आधिकरी कार्यक्रमाला विविध संतभक्त, बहिणाबाई संस्थानचे अध्यक्ष मधसुधन महाराज मोगल सर्वानंदगिरीजी महाराज पुरुषोत्तम महाराज, चांगदेव महाराज, गणेश महाराज काशीनाथ महाराज अर्जुन महाराज ग्रामस्थ आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराजांनी हरिपाठ, नामस्मरण आणि नैतिकतेच्या अंगांनी जीवन घडवण्याचे आवाहन केले.

# चाळीसगाव तालुक्यात श्रावण मासाच्या पावसाची धुव्वादार बॅटिंग, जोरदार पाऊस झाल्याने पाटणादेवी डोंगरी नदीला पूर, नदीत पाणी वाढल्याने पाटणादेवी मंदिरात भाविक अडकले, एक जण वाहून गेला

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे चाळीसगाव प्रतिनिधी :- चाळीसगाव तालुक्यात श्रावण मासाच्या पहिल्याच सुरवातीलाच जोरदार हजेरी लावली. त्यामुळे गेल्या पंधरा वीस दिवसापासून पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके कोमाजून गेली होती. बळीराजा पुढे दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले होते. जोरदार पावसाची बळीराजा प्रतिक्षा करत होता.दिनांक २५व २६ जुलै शुक्रवार, शनिवार रोजी चाळीसगाव तालुक्यात श्रावण मासाच्या पहिल्याच सुरवातीलाच जोरदार पावसाने हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे. या दोन दिवसात तालुक्यात २४ तासांत एकूण ६५.३ मिलिमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. परंतु आता पावसाने ओढ दिली आहे.

तालुक्यात गेलेल्या पंधरा दिवसांपूर्वी पावसाने दडी मारल्याने , शेतकरी चिंतातुर झाले होते. गेल्या तीन आठवड्यापासून दडी मारलेल्या पावसाचे शुक्रवार व शनिवारी जिल्ह्यात पुनरागमन झाले आहे. चाळीसगाव तालुक्यात २४ तासांत ६५.३ मिलिमिटर पाऊस झाल्याची नोंद झाली आहे. चाळीसगाव तालुक्यातील चाळीसगाव शहरासह शिरसगाव, मेहुणबारे, हातले, तळेगाव आणि खडकी गावात अतिवृष्टींची नोंद करण्यात आली. तर दोन मंडळांमध्ये देखील ५० मिलिमिटरपेक्षा जास्त पावसाची नोंद आहे. बहाळ आणि शिरसगाव या दोन मंडळांमध्ये अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला आहे. तालुक्यातील सातही मंडळात जोरदार पाऊस झाल्याचे दिसून येते. दरम्यान, डोंगरावरील पावसामुळे नदीला अचानकपणे पाणी वाढल्याने पाटणादेवी येथे कमी उंचीचा पुल पाणीखाली गेला, त्यामुळे २० ते २५ भाविक मंदिरामध्ये अडकले होते.

**मुसळधार पावसाने चाळीसगाव तालुक्यातील शेतात तुंबलेले पाणी**

चाळीसगाव तालुक्यातील २४ तासांत मंडळनिहाय पडलेला पाऊस असा चाळीसगाव ६८.३ मिमी, बहाल ५१.६ मिमी,खडकी ६८ मिमी,हातले ७० मिमी,शिरसगाव ५६.३ मिमी,मेहूणबारे ७६.८ मिमी,तळेगाव६६.३० मिमी. इतका पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. पाऊस पडल्याने शेतकरी आनंदित झाला आहे. परंतु मध्यम प्रकल्प अजून पूर्णपणे भरले नाही. तलाव नदी ओसंडून वाहत आहे. १५मध्यम प्रकल्पांपैकी वलठाण धरण हे पाटणा परिसरात दमदार पडलेल्या पावसाने डोंगरी नदीला पूरआल्याने शंभर टक्के भरले.ते ओसांडून वाहत आहेत. कोदगाव धरण हे वलठाण धरण १००टक्के भरल्याने ओसंडून वाहत असल्याने, त्याचा विसर्ग त्याच्याखाली असलेल्या कोदगाव धरणाच्या पाण्याच्या पातळीवर वाढ होऊ लागली आहे. मन्याड धरणात अजून वाढ झाली नाही मन्याड धरणाच्या जलसाठ्यात आतापर्यंत १५टक्के पाणी साठा शिल्लक आहे. नांदगाव तालुक्यातील माणिकपुंज हे धरण ९२टक्के भरले असून ते ओहरफ्लो झाल्यावर त्याचा विसर्ग मन्याड धरणाच्या पात्रात होऊन मन्याड धरणाच्या जलसाठा वाढण्यास मदत होईल. गतवर्षी मन्याड धरण हे माणिकपुंज धरण १००टक्के भरल्यावर ओहरफ्लो झाल्याने ते पाणी मन्याड नदीच्या पात्रात येऊन मन्याड धरण १००टक्के भरले होते. जळगाव जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या नांदगाव तालुक्यातील वेहेळगाव जवळील गिरणा धरण हे मागील वर्षी १००टक्के भरल्याने त्यांचा फायदा जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, पाचोरा, भडगाव जामनेर, जळगांव शहर, चाळीसगाव शहर, एमआयडीसी औद्योगिक वसाहत यांना पिण्याचे पाणीपुरवठा करणाऱ्या योजना व शेती साठी सिंचन करण्यासाठी मागील वर्षी सात आवर्तन सोडण्यात आली होती.

यावर्षी गिरणा वाढ धरणाच्या जलसाठा वाढ होत असून ठेगोंडा, कसमा पट्ट्यात पडलेल्या संततधार पावसामुळे आवकेत वाढ होऊन गिरणा धरण हे साठीकडे वाटचाल करीत आहे. चाळीसगाव तालुक्यातील नदी तलाव तुडूंब भरलेआहेत परंतु मध्यम प्रकल्प अजून तहानलेले आहेत.

**पूर आल्याने पाटणादेवी मंदिर परिसरात भाविक अडकले.**

चाळीसगाव तालुक्यातील अतिवृष्टी झाल्याने नाले, ओढे ,डोंगरी नदीला पूर आला.पाटणादेवीच्या दर्शनासाठी गेलेल्या भाविकांची डोंगरी नदीला पूर आल्याने पाटणादेवी मंदिरात जाण्यासाठी डोंगरी नदीवर असलेला पूल पाण्याखाली गेला.त्यामुळे भाविक पाटणादेवी मंदिर परिसरात ५० भाविक व व्यवसाय करणारे दुकानदार अडकून पडले होते. चार तासानंतर त्यांना बाहेर काढण्यात आले. दोन दिवसांत झालेली अतिवृष्टी डोंगरी, तितूर नदीला पूर. एक व्यक्ती वाहून गेला चाळीसगाव तालुक्यात २४ तासांमध्ये ६५.३ मिमी पाऊस झाल्याने अतिवृष्टीची नोंद झाली. पाटणादेवी डोंगरमाथ्यावर रात्री मुसळधार झालेल्या पावसामुळे शनिवारी दुपारपर्यंत हळूहळू डोंगरी नदीचे पात्रात वाढ होऊ लागली.पाणी वाढत गेले. शनिवारी दुपारी पुन्हा मुसळधार पाऊस झाल्याने या नदीवरील कमी उंचीचा बनवलेला पूल पाण्याखाली गेला. सकाळी मंदिरात दर्शनासाठी गेलेले भाविक व व्यावसायिक डोंगरी नदीला आलेल्या पुरामुळे पुरामुळे मंदिरातच अडकून पडले. ३० ते ४० भाविक नदीकाठी थांबून तब्बल तीन तास पूर ओसरण्याची वाट पाहत होते. सायंकाळी पुलावरील पाणी ओसरल्यानंतर भाविकांची सुटका झाली. दरम्यान, तितूर नदीला आलेल्या पुरात चाळीसगाव तालुक्यातील पातोंड्याचा युवक वाहून गेला असून त्यांचे नाव प्रदीप मगन भोई (वय ३६) असे त्याचे नाव आहे. त्याचा शोधकार्य चालू होते.तो त्याच दिवशी दहा तासानंतर बोरखेडा येथे सापडला. शुक्रवार आणि शनिवार या दोन दिवसांपासून रिमझिम पाऊस सुरु होती. पावसाचे पाणी घरात चाळीसगाव शहरातील नागरी वस्तीतील घरात शिरल्याने नागरिक रात्रभर गुडघाभर पाण्यात होते. पावसाचे पाणी घरात शिरल्याने चाळीसगावात नागरिक रस्त्यावर आले होते.

चाळीसगाव शहरात गेल्या दोन दिवसापासून पावसाचा जोर अधिक आहे. दोन दिवसाच्या पावसामुळे शहरातील पाणी निचऱ्याची व्यवस्था कोलमडली आहे. शहरातील आनंदवाडी परिसरातील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने परिसरातील नागरिकांनी महाराणा प्रताप चौकामध्ये रस्त्यावर येऊन रास्ता रोको केला. त्यामुळे मालेगाव व धुळ्याकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली होती. खोळंबली वाहतूक मुख्याधिकारी सौरभ जोशी आणि पोलिसांनी लोकांची समजूत काढल्यानंतर रास्ता रोको बंद मागे घेण्यात आला त्यांनतर सुरळीत झाली होती.

शहरातील काही भागात ड्रेनज पाईपामध्ये घाण अडकल्याने,पाऊस सुरू असतांना पाणी साचले होते.या भागांतील घरात व रस्त्यावर पाणी साचल्याने, या भागात पुराचे स्वरूप आले होते. रेल्वे पुला खालून गेलेल्या पाईपामध्ये घाण आटकल्याने त्या नाल्याचे पाणी रस्त्यांसह परिसरातील घरांमध्ये शिरले. त्या पाण्याचा निचरा व्हावा म्हणून प्रशासकीय इमारतीच्या बाजूने पाईप टाकण्यात आली, परंतु दुसऱ्या बाजूला पाण्याचा निचरा व्हावा म्हणून कुठल्याही उपाययोजना केली नाही.

**नागरिकांच्या घरात रात्रभर गुडघाभर पाणी**

आनंदवाडी परिसरातील जवळपास सर्वच घरांमध्ये रात्रभर गुडघ्या इतकं पाणी साचले होते.त्यामुळे सर्वांना रात्र जागून काढावी लागली. रात्री मुख्याधिकारी यांना फोन केल्याने त्यांनी जेसीबीसह फायर फायटरने तातडीने उपाययोजना केली. आनंदवाडी परिसरात उतार असल्याने सर्व पाणी या ठिकाणी येते, त्यात नाल्याचं पाणी आणि गटारीचे पाणी निघायला जागा नसल्याने याठिकाणी पाणी साचून आहे. यावर लवकर उपाययोजना करण्यात येतील. असे चाळीसगावचे नगरपालिका मुख्याधिकारी सौरभ जोशी यांनी सांगितले.

**नागरिकांचे चौकात आंदोलन**

गाडी व कर्मचाऱ्यांना पाठवले होते. त्यांनी पाणी काढण्याचा प्रयत्न केला, परंतु रात्रीची वेळ आणि अंधार असल्याने त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना काम करण्यास अडथळा येत होता. रात्र जागून काढलेल्या नागरिकांनी संताप व्यक्त करीत सकाळी ९ वाजता महाराणा प्रताप चौकात रस्ता रोको आंदोलन केले. यात आकाश पोळ, काका घोडे, बापू निकम, गुलाब वडार, रवींद्र निकम यांच्यासह परिसरातील महिलांना घेऊन रस्त्यावर आंदोलन केले. पालिका कर्मचारी गटारी काढत नाहीत, गटारीतुन पाणी बाहेर पडत नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. दरम्यान, मुख्याधिकारी सौरभ जोशी कर्मचाऱ्यांची टीम घेऊनच घटनास्थळी गेले. पोलीस उपनिरीक्षक योगेश माळी, गायकर यांनी आंदोलकांची समजूत घातली. त्यानंतर नागरीकांनी आंदोलन मागे घेतले. पावसाळापूर्व शहरातील उपाय योजना करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने उपाय योजना करणे आवश्यक होते. परंतु त्या फक्त कागदावरच आहेत की काय असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला. नगरपालिकेने नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. अशी मागणी सातत्याने होत आहे. परंतु त्या कडे गांभीर्याने बघितले जात नाही अशी तक्रार नागरिकांनी केली.

## व्ही .जे हायस्कुल नांदगाव येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहिर आण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव (वार्ताहार) - व्ही .जे हायस्कुल नांदगाव या शाळेत १ ऑगस्ट लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहिर आण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उपमुख्या डॉ योगेश्वर नांदूरकर प्रमुख वक्ते प्रा .श्री. सुरेश नारायणे व्यासपीठावर श्री. मधे भास्कर श्री. प्रविण अहिरे शालेय पंतप्रधान कु हिरे कु बोरसे आदी मान्यंवर उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते लोकमान्य टिळक व श्री. आण्णा भाऊ साठे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मनोगत कु . मृण्मयी दडंगव्हाळ , सौम्या कवडे , खुशी कायस्थ , प्रेरणा सोणवणे विशाखा दुसाने यांनी केले बोरसे मृणाल हिने स्वागत गित म्हटले . परिचय श्रीमती दिपाली सांगळे यांनी करून दिला प्रमुख वक्ते प्रा .श्री. सुरेश नारायणे यांनी सध्याच्या पिढीला उपयुक्त असे प्रबोधनपर विचार मांडून टिळकांच्या जन्मापासून स्वराज्य स्थापनेपर्यतंचा



इतिहास , संघर्ष अतिशय सोप्या पद्धतीने मांडला जणु आपण इतिहास कालीन जीवन प्रत्यक्ष बघत असल्याचा भास सर्वांना झाला त्यांचे स्पष्ट निर्भिड विचार व डेक्कन इज्युकेशन ची स्थापना पर्यतंचा इतिहास अतिशय तन्मयतेने त्यांनी मांडलेला न माहिती असलेला इतिहास कथन करून सर्वांची मने जिंकली. दुपार सत्र वक्ते श्रीमती पूर्ती देवरे, सूत्रसंचालन कु.गिरीजा वाघमारे हिने केले तर कार्यक्रमाचे आभार प्रविण आहिरे , श्री. सुरेश नवसारे, यांनी मानले. कार्यक्रमासाठी मार्गदर्शन शाळेचे मुख्या श्री. ठाकरे एल् .एन उपमुख्या श्री.डॉ नांदूरकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले . दुपार सत्रात व्यासपिठावर श्री. पाटील गुलाब , श्रीमती रुपाली झोगेकर , श्री. नवसारे सुरेश आदी मान्यवर उपस्थित होते अशा उत्साहाने कार्यक्रमाची सांगता झाली .

## नांदगाव महाविद्यालयात करिअर कट्ट्याचे उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव - मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदगाव येथे शुक्रवार दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी करिअर कट्टा उपक्रमाचे उद्घाटन झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे





प्राचार्य डॉ. आर. एन. भवरे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भुषविले व आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या वाटा व संधीची जाणिव करून दिली. त्याच प्रमाणे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. ए. मराठे, सिनेट मेंबर व भूगोल विभाग प्रमुख डॉ. सी. बी. निगळे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. एम. बी. अटोळे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. के. आर. खंदारे आणि स्पर्धा परीक्षा प्रमुख प्रा. आर. व्ही. वाघ यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील करिअर कट्ट्याचे समन्वयक प्रा. आर. टी. बिन्नर यांनी विद्यार्थ्यांना सदर उपक्रमावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. ए. एम. लव्हाटे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका एस. एम. आवारे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## बिटको महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिकरोड :- गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात विद्यार्थी सभा व एनएसएस वतीने थोर समाजसेवक साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व थोर स्वातंत्र्य सेनानी व गीता रहस्येचे रचियता लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यांनी प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य प्रा.डॉ. अनिलकुमार पठारे, विज्ञान शाखेचे प्रा. डॉ. सतीश चव्हाण, विद्यार्थी सभा कार्याध्यक्ष डॉ. लक्ष्मण शेंडगे, डॉ. भागवत गाडेकर, डॉ. साहेबराव निकम, विद्यार्थी कल्याण अधिकारी दीपक टोपे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी फारुख मुलाणी , प्रा. सुहास माळवे यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# धुळगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंची जयंती साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - येवला तालुक्यातील धुळगाव येथे लोकशाहीर आणाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली येथील ग्रामपंचायतच्या सभागृहात जयंती साजरी करण्यात आली.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते.अण्णा भाऊ साठे यांची आ-ळख संपूर्ण देशात एका लोकशाहीर म्हणून आहे. विशेषतःदलित,वंचित, शोषित यांच्या मध्ये त्यांची प्रतिमा एका लोकप्रिय जनकवीची आहे. आपल्या लेखनातून त्यांनी हाशियावरील समाजाला आक्रमक भाषा दिली. जन-चेतना निर्माण केली. लोकांना आपल्या हक्कांसाठी जागरूक केलं.झोपलेल्या समाजात सामाजिक क्रांतीचा अलख जागवला.देशाचा स्वातंत्र्यलढा,संयुक्त महाराष्ट्र आंदोलन आणि गोवा मुक्ती आंदोलन या सर्वच चळवळींमध्ये अण्णा भाऊ साठे यांचा सक्रिय सहभाग होता.देशवासीयांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी एका कलाकाराच्या



भूमिकेतून ते प्रत्येक आंदोलनात नेहमी पुढे होते.

त्यांच्या लिहलेले पोवड्या, लावण्या या मुक्ती चळवळींमध्ये नवी ऊर्जा आणि जोश निर्माण करत असत.असं आपल्या भाषणातून तालुका प्रमुख पांडुरंग शेळके पाटील यांनी सांगितले. तर पुढच्या काळात देखील याच पद्धतीने जयंती साजरी झाली पाहिजे आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार प्रत्येकाने अमलात आणावे असे माझे चेअरमन भाऊसाहेब गायकवाड यांनी मत व्यक्त केले.येथील ग्रामसेवक गोरखनाथ निकम यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा उजाळा करत उपस्थित यांचे आभार व्यक्त केले.या जयंतीचे नियोजन प्रभाकर कांबळे,मच्छिंद्र कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.यावेळी येथील ज्येष्ठ नेते राजेंद्र गायकवाड,मंगेश आहेर,बाळासाहेब गायकवाड,भाऊसाहेब गायकवाड,अमोल आहेर,दत्तात्रय गायकवाड, मच्छिंद्र गायकवाड,सतीश गायकवाड,सुनील शिंदे चेतन गायकवाड. यांच्यासह आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिजामाता गर्ल्स हायस्कूल सटाणा येथे नागपंचमी साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सटाणा - मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संचलित जिजामाता गर्ल्स हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, सटाणा येथे पारंपरिक पद्धतीने नागपंचमी सण साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांमध्ये भारतीय सणांची माहिती आणि त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा या उद्देशाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. पवार सर आणि श्री. ढेपले सर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थिनी उपस्थित होत्या

या प्रसंगी श्रीमती एम. एन. पाटील मॅडम यांनी नागपंचमी या सणाचे धार्मिक, सामाजिक आणि पर्यावरणीय महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांनी सांगितले की, पुराणकथांमध्ये नागपूजेचे महत्त्व असूनही आजच्या काळात त्याचा गैरवापर होऊ नये. नागाला दूध पाजण्याची प्रथा ही वैज्ञानिक दृष्टिकोनातून अयोग्य आहे, कारण सर्प हे दूध पचवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना दूध पाजल्यास त्यांच्यावर प्रतिकूल परिणाम होतो.




याशिवाय, त्यांनी वन्यजीव संरक्षणाचे महत्त्व पटवून देताना सांगितले की, नाग आणि इतर सर्प हे पर्यावरणातील जैवसाखळीतील महत्त्वाचे घटक आहेत. त्यांची हत्या किंवा अतिक्रमण केल्यास पर्यावरणीय समतोल बिघडू शकतो.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन आणि प्राणीमित्र भूमिका घेण्याची प्रतिज्ञा घेतली. शाळेतर्फे सण साजरे करूया, पण पर्यावरण वाचवूया असा संदेश देण्यात आला.

## बाभूळगाव येथील मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेद महाविद्यालयात चरक जयंती साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**



लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - : बाभूळगाव येथील मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेद महाविद्यालयात आयुर्वेदाचार्य महर्षी चरक यांच्या जयंती प्रेरणादायी व शैक्षणिक वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली.

प्राचार्य संजय पाटील यांच्या हस्ते प्रारंभी प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यांनी चिरंतन आयुर्वेदीय परंपरेचे महत्त्व उलगडणारे प्रेरणादायी भाषण केले. चरक जयंतीचा हा उत्सव म्हणजे परंपरेला सन्मान देत आधुनिकतेकडे झेप घेणाऱ्या आयुर्वेद विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी ठेवा ठरला. ईसीजी विषयावर डॉ. धैर्यशील पाटील यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.या दिवशी संहितापारायण,मॉडेल स्पर्धा व प्रश्नमंजुषा अशा ज्ञानवर्धक आणि विद्यार्थ्यांना सहभागासाठी प्रवृत्त करणाऱ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांचे अतिशय सुंदर नियोजन पूजा सुपारे यांनी अत्यंत कुशलतेने केले.

स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी कल्पकता,सखोल अध्ययन आणि सादरीकरण कौशल्य यांचा उत्तम समन्वय साधत उत्कृष्ट सहभाग नोंदविला.मॉडेल स्पर्धांमध्ये प्राचीन तत्त्वज्ञान आणि आधुनिक सादरीकरणाचे दर्शन घडले, तर प्रश्नमंजुषेमध्ये विद्यार्थ्यांची संहितेवरील पकड स्पष्ट दिसली. या सर्व स्पर्धांचे परीक्षण दीपाली भालेराव, सुनील बंगाळ,प्रमोद राठोड यांनी अत्यंत निष्पक्ष आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने केले. निखिल गुरव,निलांबरी दराडे यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर गुफे आणि निदा शेख यांनी केले. महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदचे सचिव निखिल जैस्वाल यांनी मनोगत व्यक्त केले.

## कै.पुंडलिक पांडूरंग मवाळ विद्यालयात लोकशाहीर आणाभाऊ साठे जयंती साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**



पिंपरखेड - आज रोजी विद्यालयात साहित्यसम्राट, लोकशाहीर आणाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. काशिनाथ गवळी यांच्या हस्ते लोकशाहीर आणाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रसंगी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थ्यांनी देखील प्रतिमा पूजन करून अभिवादन केले.

यावेळी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक संजय कांदळकर यांनी लोकमान्य टिळकांच्या जीवनावर व उत्तम सोनवणे यांनी साहित्य सम्राट आणाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर भाष्य करून विद्यार्थ्यांना त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करून दिली. तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देखील आपापले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक संजय कांदळकर, कैलास पठाडे, लक्ष्मण जाधव, उत्तम सोनवणे, संदीपभाऊ मवाळ, आबासाहेब सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले. सुत्रसंचालन संजय कांदळकर यांनी तर आभार कैलास पठाडे यांनी मानले.

## गं.भा.लीलाबाई धाटबळे यांचे निधन

**दै. आवाज वृत्तसेवा...**



निफाड /प्रतिनिधी - तालुक्यातील उंबरखेड येथील गं. भा. लिलाबाई सखाहरी धाटबळे वय -७८ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना,नातवंडे असा परिवार आहे.

निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे कर्मचारी संजय धाटबळे व सामाजिक कार्यकर्ते शिवाजी धाटबळे यांच्या त्या मातोश्री होय.

# समाज मनाच्या भावनांचा आवाज म्हणजे आण्णाभाऊ साठे - आकाश निकम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पेडकाई माता सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या माध्यमिक विद्यालय साकोरे ता नांदगाव येथे आज लोकमान्य टिळक पुण्यतिथी व आण्णासाहेब जयंती निमित्तानं कार्यक्रमा चे प्रमुख पाहुणे म्हणून फ्लॉयर अँकेडमी चे संस्थापक हे होते .निकम यांनी बोलताना लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे सदैव समाजाचा आरसा म्हणून लेखनी मधून व पोवाड्या मधून



मांडल्या ते कायम समाजासाठी व देशासाठी लढत राहिले तसेच शिक्षण हे निरंतर प्रक्रिया आहे आपण स्पर्धा परीक्षेत सहभागी व्हावे वाचन करण्याचा सल्ला दिला. यावेळी कार्यक्रमा चे अध्यक्ष म्हणून योगेश पाटील होते कार्यक्रमा चे आयोजन इयत्ता ९ वी च्या वर्गाने केले. सुत्रसंचालन मानवी बोरसे व चंचल बोरसे हिने केले तर आभार वर्गशिक्षक भाबड सर यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे निकम यांनी विद्यार्थी हितासाठी डिजीटल शिक्षणासाठी आवश्यक ते साहित्य देण्याचे घोषित केले. यावेळी शिक्षक , शिक्षकेत्तर , विद्यार्थी उपस्थित होते. आयोजकांन कडून निकम यांचा विशेष असा सन्मान केला व आभार व्यक्त केले

## स्वर्गीय रमेशशेठ कापडणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे पळाशी प्रतिनिधीः- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगळणे ता. नांदगाव येथे, पिलखोड येथील योगेश्वर कृषी सेवा केंद्राचे मालक श्री योगेश रमेशशेठ कापडणे यांनी त्यांचे वडील स्वर्गीय रमेशशेठ कापडणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले व नाश्ताही दिला तसेच वडिलांची आठवण म्हणून शालेय प्रांगणात वृक्षारोपण केले. पारंपरिक विधीमध्ये अनावश्यक खर्च न करता गरजवंत विद्यार्थ्यांना याच खर्चातून कशी मदत केली जाईल. या हेतूने योगेश कापडणे यांनी दाखविलेल्या दानशूरपणामुळे समाजामध्ये नवीन संदेश जाईल. विद्यार्थ्यांना दिलेल्या या भेटवस्तू बद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. शिवदास साखरे सर यांनी कापडणे परिवाराचे आभार व्यक्त केले.

या कार्यक्रम प्रसंगी हरिदास पाटील, पंढरीनाथ ताडगे, पंढरीनाथ काकड, श्याम ताडगे, भोये मॅडम, रणदिवे सर, भाग्यश्री पवार, विकास काकड हे उपस्थित होते.



# लासलगाव महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर चे उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव – येथील नूतन विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर च्या नियमित कार्यक्रमाचा उद्धाटन सोहळा महाविद्यालयाचा कॉन्फरन्स हॉल या ठिकाणी आज शुक्रवार दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडला. या कार्यक्रमाचे उद्धाटन अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांच्या शुभहस्ते आणि उपप्राचार्य डॉ.सोमनाथ आरोटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. प्रमुख पाहुणे म्हणून उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक श्री.उज्वल शेलार, श्री.किशोर गोसावी, श्रीमती लता तडवी, श्री जितेंद्र देवरे, श्री महेश होळकर, श्री.रामनाथ कदम, क्रीडा संचालक श्री.गणेश जाधव इ. उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती, तरुणाईचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद, स्वच्छतेचे दूत संत गाडगेबाबा आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर आणाभाऊ साठे यांच्या जयंती दिनानिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कु. पूजा खैरे व गृपने स्वागत गीताने अतिथींचे स्वागत केले. त्यानंतर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी श्री.देवेंद्र भांडे यांनी प्रास्ताविकातून रा.से.यो. ची भूमिका व राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित व विशेष श्रमसंस्कार शिबीर कार्यक्रमाचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या उद्धाटनानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संस्कारी युवक घडत असल्याचे नमूद केले तसेच समाजसेवेचे हे व्रत अंगीकारून युवक राष्ट्रसेवेच्या कामी येऊ शकतो असे प्रतिपादन यावेळी केले. तसेच पर्यवेक्षक श्री.उज्वल शेलार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे हे व्रत स्वयंसेवकांनी अंगीकारले तर आपण देखील देशसेवेच्या कामी येऊ शकतो असे सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्री.किशोर गोसावी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिस्तीचे पालन करून उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून घडावे असे आवाहन केले.

उपप्राचार्य डॉ. सोमनाथ आरोटे यांनी अध्यक्षीय समारोप करताना सुरुवातीला राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास स्वयंसेवकांसमोर मांडला तसेच राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल माहिती स्वयंसेवकांना देऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवक कशा पद्धतीने घडले आहेत हे सांगितले. देवाने आपल्याला जे दोन हात दिलेले आहे त्या दोन हातांनी मिळून आपण जर काही निस्वार्थपणे दान करू शकत असाल तर ते म्हणजे समयदान आणि आपण आपला समय या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजसेवेसाठी दान करावे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.सुनिल गायकर यांनी केले. तर आभार श्री.देवेंद्र भांडे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता एनएसएस गीताने झाली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री.गोविंदराव होळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांच्यासह सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## उत्कृष्ट वक्ता पुरस्कारासाठी सुशिलकुमार शिंदे यांची निवड
## मातोश्री कमल फाऊंडेशन वाजगाव यांचा उपक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा**

देवळा (ता. ०१ ऑगस्ट) : मातोश्री कमल फाऊंडेशन बहुउद्देशीय सामाजिक संस्था, वाजगाव (जि. नाशिक) यांच्यातर्फे युवा वक्ते, व्याख्याते, कवी, लेखक, छत्रपती शिवाजी महाराज चरित्र व कायदे अभ्यासक मा. कु. सुशिलकुमार देवराम शिंदे यांना उत्कृष्ट वक्ता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



हा पुरस्कार येत्या रविवार, दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता देवळा येथील कन्यादान बॅन्केट हॉल येथे प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मा. अनिल वैद्य (न्यायाधीश) तसेच मा. बी. जी. वाघ (सेवानिवृत्त जिल्हाधिकारी) हे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याच हस्ते सुशिलकुमार शिंदे यांना गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष एस. डी. केदारे व सचिव सोपान लहीरे यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

## येवला येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून पशुखाद्य निर्मितीचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : जगदंबा एज्युकेशन सोसायटीच्या बाभूळगाव येथील कृषी महाविद्यालयाच्या कृषिदुतांनी वडगाव येथे अझोला पशुखाद्य निर्मिती प्रात्यक्षिकाचे आयोजन केले.या माध्यमातून शेतकऱ्यांना पशुखाद्य निर्मितीची माहिती देण्यात आली. ग्रामीण कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यक्रमांतर्गत अझोला पशुखाद्य निर्मिती व व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.त्यामुळे होणारे विविध फायदे शेतकऱ्यांना पटवून दिले. या खताच्या माध्यमातून जनावरांसाठी आवश्यक शारीरिक वाढ व दूध उत्पादन वाढ होते. अझोलाचा वापर हिरवळीचे खत आणि जनावरांना खाद्य म्हणून करता येतो.पशुखाद्यामध्ये विविध पोषक घटकांचे संतुलित प्रमाण असणे आवश्यक आहे. त्यासाठी अझोल्याचा पशुखाद्यामध्ये वापर करणे फायदेशीर असल्याचे कृषिदूतांनी शेतकऱ्यांना सांगितले.




महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. व्हि. डी. शेंडे, प्राचार्य डॉ. डी. पी. कुळधर,उपप्राचार्य एस.डी. म्हस्के,कार्यक्रम अधिकारी प्रा. रोहम, मार्गदर्शक प्रा.पराडे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदुत विद्यार्थी अभिषेक लहामगे, राकेश हसले, तेजस जाधव, सिद्धेश कवडे, अनिकेत देशमुख, आनंदा गांगुर्डे, प्रसाद पवार, अमित नागरे, विनायक गायकवाड, विशाल सोनवणे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.ग्रामस्थांनी कृषी महाविद्यालयातील सर्व आयोजित विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✻ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून
**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**
प्रवेश पात्रता – १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✻ वैशिष्टे ✻
- ✻ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
- ✻ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
- ✻ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
- ✻ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
- ✻ मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
- ✻ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
- ✻ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९
पत्ता – कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.
✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया
(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५-२६

**पदवी अभ्यासक्रम**

| | | |
|---|---|---|
| B.A.<br>(Bachelor of Arts Specialization)<br>B.A. Eniglish<br>B.A. Marathi<br>B.A. Hindi<br>B.A. History<br>B.A. Geography<br>B.A. Economice<br>B.A. Politics | B.Sc.<br>(Bachelor of Science Specialization)<br>B.Sc. Chemistry<br>B.Sc. Physics<br>B.Sc. Micro Biology<br>B.Sc. Botany<br>B.Sc. Zoology | B.Com.<br>(Bachlor of Com-merce)<br>Business Administration<br>Marketing |

**प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल**

१) ॲडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻
✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799




**वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा जाहिरात तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात**

✻ संपर्क ✻
९५४५९ १०१७७/८९९९९ २१९९४